दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४८० वा ● शनिवार, ता. २७ डिसेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००




## ‘एआय’कडून मिळणारी माहिती म्हणजे ज्ञान नव्हे- अभिनेते गिरीश ओक

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

‘‘माझ्याकडे सर्व माहिती उपलब्ध आहे आणि गुगल एआयकडून ती मिळते, म्हणजे ते ज्ञान झाले असे नाही. हे मुलांना समजले पाहिजे. मुलांना कळत नसेल तर पालकांनी त्यांना ते समजावून सांगण्याची गरज आहे,’’ असे स्पष्ट मत ज्येष्ठ अभिनेते गिरीश ओक यांनी व्यक्त केले. कॅम्प येथील बी. के. मॉडेल हायस्कूलच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमास अभिनेते गिरीश ओक यांच्यासह माजी आमदार संजय पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

गिरीश ओक पुढे म्हणाले की, शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध ही पाच ज्ञानेंद्रिये योग्यरीत्या वापरली गेली नाहीत, तर सहावे इंद्रिय सुस्त होते. एखादी कलाकृती निर्माण करणे असो वा एखादे ऑपरेशन करणे असो, हे काम एआय स्वतःहून कधीच करू शकत नाही. त्यामागे असणारा मानवी मेंदूच सर्जनशील असतो. मात्र तो सर्जनशील मेंदू हळूहळू लुप्त होत चालला आहे की काय, अशी भीती वाटते. आधुनिक तंत्रज्ञानाचा अतिवापर झाल्यामुळे मुलांमधील जिज्ञासू वृत्ती कमी होत चालली असून, अशा परिस्थितीत पालकांसह शिक्षकांची जबाबदारी अधिक वाढली आहे, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थी वयाने लहान असतात, त्यांना अनेक गोष्टींची जाणीव नसते. आमच्या काळात आई-वडील सजग होते, तसेच शिक्षकांनी आम्हाला शाळेबाहेरील जगाचीही ओळख करून दिली. त्यामुळेच आम्ही सर्वांगीण घडू शकलो, असे सांगत गिरीश ओक यांनी आपल्या आयुष्यातील यशाचे श्रेय आई-वडील आणि शिक्षकांना दिले. यावेळी माजी आमदार संजय पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ज्या काळात शिक्षणाबाबत अनास्था होती त्या काळात बी. के. मॉडेल शाळा सुरू करण्याचे धाडस संस्थापकांनी दाखविले.

शाळा पुढे नेण्याचे काम शिक्षक आणि कर्तबगार संचालकांनी केले. या शाळेत कन्नड व मराठी या दोन्ही भाषांतून शिक्षण दिले जाते, ही निश्चितच कौतुकाची बाब आहे. भाषा संवादासाठी असते, वादासाठी नाही. काही जण भाषेच्या नावावर स्वतःचे दुकान चालवतात, मात्र प्रत्येकाने शिकण्याची वृत्ती ठेवली पाहिजे आणि चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बी. के. मॉडेल शाळेने माणूस घडवण्याचे कार्य केले आहे, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात मिलिंद भातखंडे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अविनाश पोतदार यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर श्रीनिवास शिवणगी यांनी आभार प्रदर्शन केले.

# साहिबजाद्यांचे शौर्य पिढ्यान्‌पिढ्यांना प्रेरणा देणारे- मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । रयत समाचार**

शीख पंथीयांचे दहावे गुरु श्री गुरु गोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग (वय ९ वर्षे) आणि साहिबजादे बाबा फतेह सिंग (वय ७ वर्षे) यांच्या अद्वितीय शौर्य व बलिदानाच्या स्मरणार्थ २६ डिसेंबर हा दिवस ‘वीर बाल दिवस’ म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने गुरूंनी दाखविलेल्या मानवतेच्या मार्गावर चालण्याचा आणि त्यांच्या विचारांना कृतीतून अंगीकारण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सायन येथील गुरुद्वारा गुरु तेग बहादूर दरबार येथे आयोजित वीर बाल दिवस कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी त्यांनी वीर शहीद साहिबजाद्यांना अभिवादन करत त्यांच्या अद्वितीय शौर्याचे स्मरण केले. कार्यक्रमात कीर्तन, कविता वाचन तसेच श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी आमदार प्रसाद लाड, आमदार तमिलसेल्वन, श्री गुरु तेग बहादूर ३५० वा शहीदी समागम समितीचे राज्यस्तरीय समन्वयक रामेश्वर नाईक, पंजाबी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष बल मलकित सिंग, गुरुद्वारा समितीचे सदस्य दलजीत सिंग, गुरुदेव सिंग, जसपाल सिंग सिद्धू, हॅपी सिंग, डॉ. अजयसिंग राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राष्ट्रासाठी आपले शीश अर्पण करणारे गुरु तेग बहादूर साहेब यांचे बलिदान देश कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्या संपूर्ण कुटुंबाने देश, संस्कृती आणि धर्मरक्षणासाठी दिलेले बलिदान इतिहासात अजरामर आहे. २६ डिसेंबरला ‘वीर बाल दिवस’ साजरा करण्याचा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असून यामुळे पुढील पिढ्यांना या महान बलिदानाची जाणीव राहील. ते पुढे म्हणाले की, गुरु गोविंद सिंगजी यांचे सुपुत्र साहिबजादे बाबा जोरावर सिंग आणि बाबा फतेह सिंग यांच्या शौर्याचे स्मरण करण्याचा हा दिवस आहे. इतक्या लहान वयात त्यांनी दाखवलेले धैर्य, निष्ठा आणि त्याग संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या बलिदानातून प्रेरणा घेऊन मानवतेची सेवा करण्याचा आणि धर्म, सत्य व मूल्यांच्या रक्षणासाठी सदैव सज्ज राहण्याचा संकल्प प्रत्येकाने करावा. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गुरु गोविंद सिंग यांच्या संपूर्ण परिवाराने दिलेले बलिदान देशासाठी सदैव प्रेरणास्थान राहिले आहे. इतक्या भीषण अत्याचारांनाही सामोरे जाऊनही त्यांनी आपल्या ध्येयापासून कधीही माघार घेतली नाही. साहिबजाद्यांसारख्या कोवळ्या वयातील बालकांनाही शहीद करण्यात आले, ही घटना मानवतेला हादरवणारी आहे. राज्य शासनाकडून गुरु तेग बहादूर यांचे शहीदी समागम वर्षही साजरे करण्यात येत असून ‘हिंद दी चादर’ म्हणून ओळखले जाणारे गुरु तेग बहादूर यांनी देश, धर्म व संस्कृतीच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान दिले, असे त्यांनी सांगितले. गुरुबाणीच्या माध्यमातून मानवतेचा, करुणेचा व सेवेचा संदेश आजही समाजाला मार्गदर्शन करीत आहे. गुरूंच्या विचारांमुळेच जीवनाला योग्य दिशा मिळते. त्यांच्या त्यागामुळेच आपले अस्तित्व, पंथ, भाषा आणि संस्कृती टिकून आहेत. त्यामुळे त्यांच्या बलिदानापुढे सर्वांनी नतमस्तक व्हावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साहिबजाद्यांच्या शौर्याच्या स्मरणार्थ ‘वीर बाल दिवस’ साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, हा दिवस नव्या पिढीला प्रेरणा देणारा ठरत आहे.



## प्रशांत जगताप काँग्रेसमध्ये; राजकीय चर्चांना पूर्णविराम




**पुणे । रयत समाचार**

गेल्या काही दिवसांपासून पुणे जिल्ह्यात शरद पवार गटातील राजकीय घडामोडींवर सुरू असलेल्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. पुण्याचे माजी महापौर व शरद पवार गटाचे माजी शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी काल अधिकृतपणे काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. आज सकाळीच एका वृत्तवाहिनीला दिलेल्या प्रतिक्रियेत प्रशांत जगताप यांनी एकनाथ शिंदे व उद्धव ठाकरे या दोन्ही गटांकडून आपल्याला प्रवेशाची ऑफर असल्याचे स्पष्ट केले होते. पुढील तीन ते चार तासांत अंतिम निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. अखेर दोन्ही पक्षांच्या ऑफर नाकारत त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर अजित पवार ४० आमदारांसह सत्तेत सहभागी झाले होते. त्या काळात प्रशांत जगताप यांनी शरद पवार यांची साथ देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी पुण्यात शरद पवार गट व अजित पवार गट यांच्यात आघाडी करण्याचा निर्णय झाल्यानंतर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. ही आघाडी झाल्यास आपण पक्ष सोडू, असा इशाराही त्यांनी दिला होता. शरद पवार गटाकडून त्यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न झाले असले तरी त्यांनी आपली भूमिका कायम ठेवत पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यानंतर गेल्या दोन दिवसांपासून ते कोणत्या पक्षात प्रवेश करणार, याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू होते. उद्धव ठाकरे यांनी थेट फोन करून संपर्क साधल्याचेही त्यांनी सांगितले होते. मात्र अखेर त्यांनी दोन्ही शिवसेना गटांना नकार देत काँग्रेसमध्ये प्रवेश करून आपला राजकीय निर्णय स्पष्ट केला आहे. या पक्षप्रवेशामुळे पुण्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसला याचा फायदा होईल, अशी चर्चा सुरू आहे.

## मग मला बेळगावला येताना का रोखले नाही? निकम यांचा सवाल



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

महाराष्ट्रातील नेते व लोकप्रतिनिधींना बेळगाव जिल्ह्यात येण्यापासून रोखले जात असेल, तर मला आज येथे येताना का अडविण्यात आले नाही? असा सवाल ज्येष्ठ विधीज्ञ पद्मश्री उज्ज्वल निकम यांनी पत्रकारांशी बोलताना उपस्थित केला. उज्ज्वल निकम हे काल बेळगाव येथील ज्ञानदीप एज्युकेशन ट्रस्टच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. पत्रकारांनी त्यांना खासदार धैर्यशील माने यांनी महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींना बेळगावमध्ये येण्यास रोखले जात असल्याबाबत संसदाध्यक्षांकडे तक्रार केल्याची माहिती दिली व या विषयावर त्यांची प्रतिक्रिया जाणून घेतली. यावर बोलताना उज्ज्वल निकम म्हणाले की, महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींना बेळगावमध्ये येण्यास रोखले जाते, याची मला कल्पना नाही. मात्र खासदार धैर्यशील माने यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे यासंदर्भात तक्रार केली असेल, तर त्याची माहिती मी घेईन. तसेच या महत्त्वाच्या विषयावर खासदार धैर्यशील माने यांच्याशीही चर्चा करेन, असे त्यांनी स्पष्ट केले.

## सतिश काळे यांचा क्रांतिरत्न पुरस्काराने गौरव




**पिंपरी । रयत समाचार**

येथील संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतिश काळे यांना सामाजिक, वैचारिक व बहुजनहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत २०२५ चा ‘क्रांतिरत्न पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. देहूरोड येथील ऐतिहासिक धम्मभूमीच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य कार्यक्रमात हा सन्मान करण्यात आला. बुद्धविहार कृती समिती व धम्मभूमी फेस्टिव्हल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्याचे संयोजक टेक्सास गायकवाड होते. अष्टप्रधान मंडळ, बुद्धविहार कृती समिती, धम्मभूमी सुरक्षा समिती, धम्मभूमी एज्युकेशन सोसायटी, धम्मभूमी महिला महासंघ व ज्येष्ठ उपासक संघ यांच्या सहकार्याने कार्यक्रम पार पडला. पुरस्कार प्रदान करताना आयोजकांनी नमूद केले की, क्रांतिकारी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून सतिश काळे यांनी निधड्या छातीने ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध लढा देत बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. मराठा व बहुजन बांधवांना आरक्षण मिळवून देण्यासाठी केलेली त्यांची कामगिरी अविस्मरणीय आहे. ऐतिहासिक धम्मभूमीवर मिळालेल्या या सन्मानामुळे सामाजिक कार्यकर्ते, कार्यकर्त्यांमध्ये समाधान व्यक्त होत असून सतिश काळे यांच्या कार्याला नवी ऊर्जा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.




## शीख समाजाची त्यागाची, बलिदानाची परंपरा देशासाठी प्रेरणादायी- दामू नाईक

**पणजी । रयत समाचार**

भारतभूमीसाठी शीख समाजाचे मोठे योगदान असून, त्यांच्या त्यागाची आणि बलिदानाची परंपरा देशासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी केले. शुक्रवारी बेती येथील गुरुद्वाराला त्यांनी भेट देऊन शहीदांना नमन केले. यावेळी पर्यटन मंत्री रोहन खंवटे, आमदार केदार नाईक तसेच गुरुद्वारा समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. दामू नाईक म्हणाले की, गुरु गोविंद सिंग महाराजांच्या पश्चात त्यांच्या पुत्रांनी साहिबजादे जोरावर सिंग आणि फतेह सिंग यांनी धर्मासाठी अद्वितीय बलिदान दिले. त्यांना धर्मांतरासाठी दबाव टाकण्यात आला होता; मात्र त्यांनी तो नाकारत धर्मनिष्ठेचा आदर्श ठेवला. अखेरीस त्यांना जिवंत भिंतीत गाडण्यात आले. त्यांच्या या बलिदानाची आठवण कायम राहावी, पुढील पिढीला राष्ट्रप्रेम व धर्मनिष्ठेची प्रेरणा मिळावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘वीर बाल दिवस’ साजरा करण्याची संकल्पना मांडली, असेही त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, भाजप सरकारने शीख समाजासाठी विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. फतेहपूर येथील गुरुद्वाराचे दरवाजे खुले करण्यात आले, तसेच करतारपूर कॉरिडॉरच्या माध्यमातून श्रद्धाळूंना दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करण्यात आले. शीख समाजाकडून लंगराच्या माध्यमातून समाजसेवा केली जाते. या सेवेसाठी लागणारे साहित्य जीएसटीमुक्त करण्यात आले आहे. तसेच शीख समाजाच्या योगदानाचा इतिहास शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे. राज्यातील प्रत्येक नागरिकाने शीख समाजाचे तसेच साहिबजादे जोरावर सिंग व फतेह सिंग यांच्या बलिदानाची माहिती करून घेणे आवश्यक आहे, असे आवाहनही दामू नाईक यांनी यावेळी केले.

## शंभर वर्षे म्हणजे केवळ कालावधी नव्हे, तर संघर्ष व क्रांतीचा इतिहास- शितोळे

### भाकप शताब्दीनिमित्त ध्वजारोहण व रॅली




**अहमदनगर । रयत समाचार**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेच्या शताब्दीनिमित्त शहरातील बुरुडगाव रोड येथील पक्ष कार्यालयासमोर शुक्रवार, ता. २६ डिसेंबर रोजी उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी लाल ध्वज फडकावत ‘लाल सलाम’च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. देशासाठी पक्षाने दिलेल्या त्याग, बलिदान व संघर्षाच्या इतिहासाची उजळणी करत शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. भाकप कार्यालयातून निघालेल्या रॅलीत कार्यकर्त्यांनी हातात लाल ध्वज घेऊन शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण केले. जुने बसस्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज, माळीवाडा येथील महात्मा फुले तसेच मार्केटयार्ड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर हमाल पंचायत येथील सभागृहात शताब्दी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. हा मेळावा भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी कॉ. कारभारी उगले, आनंद शितोळे, जिल्हा सहसचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. संतोष खोडदे, पांडुरंग शिंदे, श्रीधर आदिक, लक्ष्मण नवले, ज्ञानदेव सहाने, बबनराव पवार, दत्तात्रय आरे, बापूराव राशीनकर, बबनराव लबडे, रमेश नागवडे, भारती न्यालपेल्ली, सगुना श्रीमल, संगिता कोंडा, लक्ष्मीबाई कोटा, कन्हैय्या बुंदेले, सुभाष शिंदे, बेबीनंदा लांडे, भारत आरगडे, मारुती दहिफळे, सतीश पवार, राजेंद्र आव्हाड, रामदास वागस्कर, नानासाहेब कदम आदींसह भाकपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रास्ताविकात कॉ. संतोष खोडदे यांनी २६ डिसेंबर १९२५ रोजी कानपूर येथे झालेल्या पहिल्या कम्युनिस्ट परिषदेने भारतीय राजकारणाला नवे वळण दिल्याचे सांगितले. स्वातंत्र्यलढ्यापासून लोकशाही, कामगार व सांस्कृतिक चळवळीपर्यंत पक्षाने महत्त्वाची भूमिका बजावली असून देशाची अखंडता व एकात्मता जपण्यात भाकपचा मोलाचा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, विविध टप्प्यांवर धोरणात्मक मतभेद व राजकीय आव्हानांचा सामना करावा लागल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी आर्किटेक्ट अर्शद शेख, अशोक सब्बन व डॉ. आदित्य न्यालपेल्ली यांनीही शुभेच्छा व्यक्त केल्या. कॉ. आनंद शितोळे यांनी बोलताना सांगितले की, स्वातंत्र्यानंतरचा काळ हा पक्षासाठी संधी आणि आव्हानांचा होता. कारखाना बंदी, मजुरीचे प्रश्न, कामगार संघटन, जमीनहक्क व शेतकरी आंदोलनांतून पक्षाने अनेक महत्त्वाचे संघर्ष उभे केले. सार्वजनिक संपत्तीचे राष्ट्रीयीकरण, कामगार कायद्यांसाठी लढे आणि न्यायालयीन संघर्षांमुळे कामगारांना प्रत्यक्ष संरक्षण मिळाले. शंभर वर्षे म्हणजे केवळ कालावधी नव्हे, तर संघर्ष, अनुभव आणि क्रांतीचा इतिहास आहे. डाव्या विचारसरणीने कला व साहित्य क्षेत्रातही खोलवर प्रभाव टाकला असून प्रोग्रेसिव्ह रायटर्स असोसिएशन व इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशनसारख्या चळवळींनी जनमानसाशी संवाद साधला, असे त्यांनी नमूद केले. कॉ. ॲड. सुभाष लांडे म्हणाले की, समाजातील तळागाळातील शेतकरी, कामगार, उपेक्षित व वंचित घटकांना न्याय देण्यासाठी भाकपने सातत्याने संघर्ष केला आहे. स्वातंत्र्यानंतर देशाच्या जडणघडणीत सामान्य जनतेचे प्रतिनिधित्व करत शोषणमुक्त समाजनिर्मितीसाठी पक्षाने मोलाचे योगदान दिले. आजच्या काळात इतिहासातून शिकत आधुनिक वास्तवाशी जुळवून घेत कामगारांचे हक्क, सामाजिक समता व लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी अधिक जोमाने काम करण्याची गरज आहे. पुढील शतकातील नव्या प्रश्नांना सामोरे जाण्यास पक्ष सज्ज असून कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्य शिवाजी देवढे यांनी १९२० च्या दशकातील कामगार व शेतकरी प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर १९२५ मध्ये कानपूर येथे विविध कम्युनिस्ट गट एकत्र येऊन राष्ट्रीय पक्षाची स्थापना झाल्याचा इतिहास उलगडून सांगितला. कानपूर व मेरठ कट कारस्थान प्रकरणांमुळे पक्षाच्या नेतृत्वावर हल्ले झाले, मात्र याच संघर्षातून अनेक नेते जनतेसमोर उभे राहिले, असा शंभर वर्षांचा ऐतिहासिक पट त्यांनी मांडला. कॉ. ॲड. सुधीर टोकेकर यांनी कम्युनिस्ट पक्षात तरुण वर्गाला अधिक संधी देण्याची गरज व्यक्त करत आभार मानले. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयटक व बिडी कामगार युनियनच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक – २०२५-२६



## माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक



### शब्दांपेक्षा काम, आश्वासनांपेक्षा कृती

महानगरपालिकेचे कामकाज सर्वसामान्य नागरिकांना थेट करता येणे शक्य नसते. म्हणूनच नागरिक आपल्या प्रश्नांचा आवाज महानगरपालिकेत पोहोचवण्यासाठी नगरसेवक निवडून देतात. प्रभागातील जनतेचा विश्वास हीच लोकप्रतिनिधीची खरी ताकद असते. प्रभागामध्ये पिण्याचे पाणी, रस्ते, गटारी, ड्रेनेज, स्वच्छता अशा मूलभूत प्रश्नांवर सातत्याने काम करण्याची जबाबदारी मी माझ्या मागील पाच वर्षांच्या नगरसेविका कार्यकाळात प्रामाणिकपणे पार पाडली. नागरिकांचे प्रश्न ऐकून घेणे, त्यावर पालिकेत ठामपणे आवाज उठवणे आणि तो प्रश्न सुटेपर्यंत पाठपुरावा करणे, हीच माझी कार्यशैली राहिली आहे. कोविडसारख्या नैसर्गीक आपत्तीच्या संकटकाळात नागरिकांचे रोजगार गेले, उत्पन्न थांबले आणि आर्थिक अडचणी वाढल्या. अशा वेळी नागरिकांवर घरपट्टीसारखे आर्थिक ओझे टाकणे अन्यायकारक असल्याची ठाम भूमिका घेत कलम १३३अ अंतर्गत घरपट्टी माफ करण्याची मागणी मी महानगरपालिकेत आक्रमकपणे मांडली. जसे मुंबई महानगरपालिकेत घरपट्टी माफीचा दिलासा दिला, तसा आपल्या मनपात मिळावा, अशी माझी भुमिका आहे.

संकटात जनतेच्या बाजूने उभे राहणे, हेच माझे राजकारण आहे. मी केवळ फाईली पुढे ढकलणारी नगरसेविका नसून, नागरिकांना न्याय मिळेपर्यंत प्रशासनाशी संघर्ष करणारी लोकप्रतिनिधी आहे. नागरिकांशी थेट संपर्क, प्रभागातील समस्यांचे अचूक भान आणि त्यावर ठोस उपाययोजना, हेच माझ्या कामाचे प्रगतीपुस्तक आहे. येणाऱ्या निवडणुकीतही प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी मी ठामपणे काम करणार आहे. शासनाच्या विविध योजना प्रभागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून त्याचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना मिळवून देण्यासाठी माझा लढा सुरूच राहील. जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ न देता, प्रभागाच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या न्यायासाठी उभी राहणे, हीच माझी भूमिका आहे. वैभवशाली नगर अर्बन बँक वाचावी, यासाठी आमचे सहकार्य सतत राहील याची ग्वाही देते.

**प्रभाग ११**
**सोनाली अजय चितळे,**
**संपर्क : ९३२५२५७२१३ / ९८८१४५१३३१**

# मनपा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडी सज्ज

## नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करत महापालिकेचे रणशिंग फुंकले

**अहमदनगर | रयत समाचार**

जिल्ह्यात नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका व नगरपरिषद निवडणुकांत प्रस्थापित राजकीय पक्षांना जोरदार धक्का देत वंचित बहुजन आघाडीने उल्लेखनीय यश मिळवले. या यशाच्या पार्श्वभूमीवर आता वंचित बहुजन आघाडीने अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीसाठी तयारी सुरू केली असून, समविचारी पक्षांसोबत अथवा स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्धार पक्षाने जाहीर केला आहे. जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपरिषदांमध्ये नवनिर्वाचित झालेल्या वंचित बहुजन आघाडीच्या पाच नगरसेवकांचा जाहीर सत्कार सोहळा अहिल्यानगर शहरात उत्साहात पार पडला. यावेळी जामखेड नगरपरिषदेचे नगरसेवक ॲड. अरुण जाधव व संगीता भालेराव, देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे संतोष चोळके तसेच संगमनेर नगरपरिषदेचे अमजदखान पठाण व विजयाताई गुंजाळ यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याच्या माध्यमातून वंचित बहुजन आघाडीने



महानगरपालिका निवडणुकीचे रणशिंग फुंकले. याप्रसंगी राज्य प्रवक्ते ॲड. अरुण जाधव यांनी ग्रामीण भागात मिळालेल्या यशाचा उल्लेख करत, आता अधिक ताकद, जिद्द आणि संघटनशक्तीच्या जोरावर महानगरपालिकेतही पक्षाचा झेंडा फडकवण्याचे आवाहन केले.

जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी सांगितले की, सर्वसामान्य, वंचित व उपेक्षित घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत पक्ष आगामी महानगरपालिका निवडणूक लढवणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे होते. वंचित बहुजन आघाडी अहिल्यानगर दक्षिण जिल्हा, शहर, तालुका तसेच युवा आघाडीच्या वतीने हा जाहीर सत्कार आयोजित करण्यात आला होता. याशिवाय भारतीय बौद्ध महासभा, पारनेर तालुका कार्यकारिणी तसेच सम्यक विद्यार्थी आंदोलन यांच्या वतीनेही नवनिर्वाचित नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रभाग क्रमांक ९-क मधून शोभा आल्हाट यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक पाटोळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन पोपट जाधव यांनी मानले. यावेळी सुहास धीवर, मनोज साळवे, शोभा आल्हाट, भंते सुमित बोधी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जे. डी. शिरसाठ, सुधीर ठोंबे, हनीफ शेख, सोमनाथ भैलुमे, प्रवीण ओरे, राजीव भिंगारदिवे, योगेश क्षीरसागर, गणेश राऊत, संकेत शिंदे, शोभा आल्हाट, दिव्या साळवे, मदीना पठाण, सीमा आल्हाट, गौरव आल्हाट, रोहित आल्हाट, विशाल साळवे, दीपक ससाणे, वैभव मोकळ, पिंटू साळवे, फैरोज पठाण, रियाज शेख, प्रतीक ठोकळ, देविदास भालेराव, सुहास धिवर, विवेक कसबे, बाळासाहेब गायकवाड, मनोज साळवे, प्रशांत छजलानी, विकास गायकवाड, जय कदम, गणेश पोळ आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. या जाहीर सत्कार सोहळ्यामुळे वंचित बहुजन आघाडीने आगामी महानगरपालिका निवडणुकीसाठी संघटनात्मक ताकद, तयारी आणि आत्मविश्वास दाखवून दिल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# ब्राह्मण समाजास १० टक्के प्रतिनिधित्व द्या– निसळ

**अहमदनगर | रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक २०२५ मध्ये ब्राह्मण समाजास किमान १० टक्के प्रतिनिधित्व देण्यात यावे, अशी मागणी अखिल भारतीय बहुभाषीय ब्राह्मण महासंघाचे युवा प्रदेशाध्यक्ष मंगेश निसळ यांनी केली आहे. शहरात ब्राह्मण समाजाची लोकसंख्या अंदाजे ३५ ते ४० हजार असून, शहरातील सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात हा समाज सक्रियपणे कार्यरत आहे. सुनील रामदासी, महेंद्र गंधे, सचिन पारखी, नरेंद्र कुलकर्णी, मिलिंद गंधे, अमित गटणे, सुमित कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, मयूर जोशी, पुष्कर कुलकर्णी, वैभव जोशी, पंकज जहागीरदार, धनंजय जामगावकर, प्रमोद कुलकर्णी, कालिंदी केसकर, प्रिया जानवे, संध्या पावसे, वंदना पंडित, रेणुका करंदीकर, सविता तागडे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते विविध संस्थांच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्य करत आहेत. हे सर्व कार्यकर्ते भारतीय जनता पार्टी, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या महायुतीच्या माध्यमातून संघटनात्मक काम करत असून शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. ब्राह्मण समाज हा परंपरेने भारतीय जनता पार्टीशिवसेना युतीचा पारंपरिक मतदार राहिला असून, मागील दोन विधानसभा निवडणुकांत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या विजयातही या समाजाचा महत्त्वाचा वाटा राहिला आहे. सनातन हिंदू संस्कृतीचे जतन, संवर्धन व समाजाला दिशा देण्याचे कार्य हा समाज सातत्याने करीत आला आहे. मात्र, अलीकडील काळात स्थानिक राजकारणात या समाजाला अपेक्षित व योग्य प्रतिनिधित्व मिळत नसल्याची भावना वाढीस लागली आहे.

योग्य प्रतिनिधित्व न मिळाल्यास ब्राह्मण समाजामध्ये जाणीवपूर्वक दुर्लक्षित केल्याची भावना अधिक तीव्र होऊ शकते, तसेच निवडणुकीच्या दृष्टीने समाज नकारात्मक भूमिकेकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही मंगेश निसळ यांनी स्पष्ट केले. आवश्यक ते प्रतिनिधित्व न दिल्यास लोकशाहीने दिलेल्या अधिकाराचा वापर करून 'नोटा'चा पर्याय स्वीकारून निषेध नोंदविण्याचा मार्गही खुला असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भातील निवेदन महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, महायुतीतील घटक पक्षांचे प्रदेशाध्यक्ष तसेच जिल्हाध्यक्ष यांना पाठविण्यात आले असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# माहिती नाही, तर मतदान नाही

## महापालिकेला सजग नागरिक मंचाचा इशारा

**नवी मुंबई | रयत समाचार**

महानगरपालिकेच्या कारभारात पारदर्शकता आणण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप करत, करदाते नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांची पायमल्ली थांबवावी, अन्यथा आगामी महानगरपालिका निवडणुकीत मतदान बहिष्कार अथवा मोठ्या प्रमाणावर नोटाचा वापर करण्याचा निर्णय घेतला जाईल, असा इशारा सजग नागरिक मंच, नवी मुंबई यांनी दिला आहे. या संदर्भात सजग नागरिक मंचच्या वतीने महापालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले असून, त्याची प्रत राज्य निवडणूक आयुक्तांनाही पाठवण्यात आली आहे. लोकशाही केवळ पाच वर्षांतून एकदा मतदान करण्यापुरती मर्यादित नसून प्रशासनाने नागरिकांप्रती उत्तरदायी, पारदर्शक व कायद्याच्या चौकटीत काम करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, माहितीचा अधिकार कायदा २००५ मधील कलम ४ नुसार महापालिकेने स्वतःहून सर्व माहिती सार्वजनिक करणे कायदेशीर बंधनकारक आहे. मात्र, प्रत्यक्षात नवी मुंबई महानगरपालिका आपला कारभार जाणीवपूर्वक अपारदर्शक ठेवत असून नागरिकांच्या सातत्यपूर्ण मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे. सजग नागरिक मंचच्या वतीने पारदर्शकतेसाठी ई-मेल मोहिम राबवण्यात आली होती. त्याअंतर्गत १५० हून अधिक नागरिकांनी थेट आयुक्तांकडे मागण्या सादर केल्या; तरीही कोणताही ठोस प्रतिसाद मिळालेला नाही, असा आरोप करण्यात आला आहे. मंचाच्या वतीने कायदेशीर नोटीस देऊनही दोन ते तीन महिने उलटून गेले असताना प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही न झाल्याने ही बाब केवळ प्रशासकीय उदासीनता नसून नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांचा गंभीर अवमान असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. महानगरपालिकेचा खर्च, निविदा प्रक्रिया, विकासकामांचा तपशील, निधीचा वापर यासंबंधीची माहिती सामान्य नागरिकांना सहज उपलब्ध नसणे ही गंभीर बाब असून, अशा गुप्त कारभारातून भ्रष्टाचाराला खतपाणी मिळते, असा आरोपही करण्यात आला आहे. करदाते नागरिक व मतदारांपासून प्रशासनाचा कारभार लपवणे ही बाब लोकशाही मूल्यांशी विसंगत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या मागण्यांवर तातडीने ठोस कार्यवाही न झाल्यास ''माहिती नाही तर मतदान नाही'' (No Transparency, No Vote) या भूमिकेतून आगामी नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदान बहिष्कार किंवा मोठ्या प्रमाणावर चा वापर करण्याचे आवाहन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. यासाठी सोशल मीडियासह फ्लेक्स, बॅनरच्या माध्यमातून जनजागृती मोहीम राबवली जाईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे नागरिकांमध्ये लोकशाहीबाबत निर्माण होणाऱ्या असंतोषास संपूर्णपणे महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहील, असे स्पष्ट करत सजग नागरिक मंचने तातडीने दखल घेऊन नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांची पूर्तता करण्याची मागणी केली आहे.

**सजग नागरिक मंचच्या प्रमुख मागण्यांमध्ये: महानगरपालिकेच्या सर्व विभागांचा प्रभागनिहाय खर्च व लेखाजोखा अधिकृत संकेतस्थळावर नियमित प्रसिद्ध करणे, नगरसेवक निधीचा तपशील, केलेली कामे व निवडणूकपूर्व आश्वासनांची पूर्तता यांचा अहवाल सार्वजनिक करणे, निवडणुकीत उभ्या राहणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, आर्थिक विवरण व गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती मतदारांना उपलब्ध करून देणे, निवडणूक काळात पैसे, वस्तू अथवा अन्य प्रलोभने देण्यावर स्वतंत्र व पारदर्शक यंत्रणेद्वारे कडक नियंत्रण ठेवणे, तसेच व्हॉट्सॲपसारख्या माध्यमांचा वापर करून ''नागरिक संवाद'' उपक्रम सुरू करणे, या मागण्यांचा समावेश आहे.**

SAJAK NAGRIK MANCH
NAVI MUMBAI
संघर्ष नव्हे ! संवादातून व्यवस्था परिवर्तन !!

# 'आप'ने ठोकला शड्डू, पहिली यादी जाहीर; महाविकास आघाडी, युतीला आव्हान

**अहमदनगर | रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय रणधुमाळीला वेग आला असतानाच आम आदमी पार्टीने (आप) उमेदवारांची पहिली यादी जाहीर करत निवडणुकीत आघाडी घेतली. महाविकास आघाडीवर शिक्कामोर्तब झाले असले, तरी महायुतीमध्ये अद्याप जागावाटपावरून ओढाताण सुरू असून दोन्ही आघाड्यांनी उमेदवारांची अधिकृत यादी जाहीर केलेली नाही. अशा परिस्थितीत 'आप'ने दहा उमेदवारांची पहिली यादी जाहीर करून महापालिका निवडणुकीत एन्ट्री केली. महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असून ३० डिसेंबरपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. महायुतीमध्ये जागावाटपावरून चर्चांचा फेरा सुरू असताना महाविकास आघाडीनेही अद्याप 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीने पहिल्याच टप्प्यात उमेदवार जाहीर करून राजकीय वातावरण ढवळून काढले आहे. आम आदमी पार्टी पहिल्यांदाच अहिल्यानगर महापालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरली असून, महापालिकेच्या सर्व ६८ जागांवर उमेदवार देण्याचा निर्धार पक्षाने केला आहे. उमेदवारांच्या प्रचारासाठी आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यासह पक्षाचे दिग्गज नेते अहिल्यानगरमध्ये येणार असल्याची माहिती शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ यांनी दिली.

**महानगरपालिका निवडणुकीसाठी आम आदमी पार्टीने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत दहा उमेदवारांचा समावेश आहे. यामध्ये प्रकाश जनार्धन वडवणीकर (प्रभाग ३-अ), दिलीप दत्तात्रय घुले (प्रभाग ३-ड), रामा आण्णा शिंदे (प्रभाग ६-अ), सुनील माणिकराव ठाकरे (प्रभाग ७-अ), विद्या विजय शिंदे (प्रभाग ७-ब), भरत श्रीराम खाकाळ (प्रभाग ७-ड), संदीप देविदास पखाले (प्रभाग १६-अ), राजू हिरालाल गुजर (प्रभाग १६-क), निर्मला विक्रम श्रीरसागर (प्रभाग १७-अ) आणि राधा प्रकाश वडवणीकर (प्रभाग ३-ब) यांचा समावेश आहे.**


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
– संपर्क –
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# रेल्वेचा प्रवास महागला; स्लीपर, एसी कोच तिकीटदरात वाढ

**श्रीरामपुर । शफीक बागवान**

देशात महागाईने आधीच कंबरड मोडलं असताना आता रेल्वेचा प्रवासही महागणार आहे. रेल्वेच्या तिकिटात १० ते ५० रुपये वाढ करण्याचा निर्णय रेल्वे विभागाने घेतला आहे. दरम्यान, सर्वसामान्य जनतेला परवडणारी रेल्वे आता त्यांच्यासाठी काळ ठरू लागली आहे. २६ डिसेंबरपासून नवे तिकिटांचे दर लागू होतील, अशी माहितीही रेल्वे विभागांकडून देण्यात आली. लांब पल्ल्याच्या मेल, एक्सप्रेस गाड्यांच्या तिकीटात ही वाढ करण्यात आल्याचं रेल्वेविभागाकडून सांगण्यात आलं आहे.

२१५ किंवा त्यापेक्षा जास्त किमी प्रवासासाठी एक पैसा प्रति किलोमीटर दर इतके दर वाढवण्यात आले आहेत. या संदर्भात रेल्वे बोर्डाने एक परिपत्रक जारी केले. सध्या लखनौ मेलच्या फर्स्ट एसी, सेकंड एसी, थर्ड एसी, थर्ड एसी इकॉनॉमी आणि स्लीपर कोचचे तिकीट अनुक्रमे १,९७० रुपये, १,१८० रुपये, ८४५ रुपये, ७५८ रुपये आणि ३३० रुपये इतके आहे. मात्र, २६ डिसेंबरपासून तिकीटांचे दर वाढणार असून अनुक्रमे १,९८० रुपये, १,१९० रुपये, ८५५ रुपये, ७९५ रुपये आणि ३४० रुपये इतके होण्याची शक्यता आहे. याशिवाय शताब्दी एक्सप्रेसच्या चेअर कार आणि एक्झिक्युटिव्ह क्लासच्या तिकिटांचे दरही वाढणार आहे. सध्या याचे तिकिटांचे दर अनुक्रमे २,१६५ रुपये आणि १,४०५ रुपये आहे. हे दर वाढून आता अनुक्रमे २,१७६ रुपये आणि १,४१६ रुपये होणार आहे. लखनौहून मुंबईला जाणाऱ्या पुष्पक एक्सप्रेसच्या फर्स्ट एसी, सेकंड एसी, थर्ड एसी आणि स्लीपर कोचचे भाडे २६ डिसेंबरपासून अनुक्रमे ४,१०५ रुपये, २,४४४ रुपये, १,७२४ रुपये आणि ६७९ रुपये होण्याची शक्यता आहे. तसेच बेगमपुरा एक्सप्रेसच्या फर्स्ट एसी, सेकंड एसी, थर्ड एसी आणि स्लीपर कोचचे भाडे अनुक्रमे ३,२३० रुपये, १,९३० रुपये, १,३७५ रुपये आणि ५४० रुपये होणार आहे. दरम्यान, या भाडेवाढीमुळे रेल्वेला सुमारे ६०० कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळणार असल्याची माहिती आहे. महत्त्वाचे म्हणजे दैनंदिन प्रवासी आणि अल्प पल्ल्याचा प्रवासासाठी कोणतीही तिकीटवाढ करण्यात आली नसल्याचं रेल्वे विभागाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. याशिवाय आधीच आरक्षण केलेल्या प्रवाशांकडून वाढीव भाडे आकारले जाणार नाही, असेही रेल्वेकडून सांगण्यात आलं आहे. लोकल (उपनगरीय) सेवा आणि मासिक पासच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही,असंही रेल्वे विभागाने सांगितलं आहे. यंदा रेल्वे तिकिटांच्या दरात ही दुसरी वाढ असून, यापूर्वी १ जुलै रोजी मेल-एक्सप्रेस गाड्यांच्या भाड्यात प्रति किलोमीटर १ पैशांची वाढ करण्यात आली होती.





## बी.पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटी एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या संचालकपदी विकास कांबळे बिनविरोध

**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर महाविद्यालय, येथे कार्यरत असलेल्या बी. पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटी एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.च्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत विकास कांबळे यांची संचालकपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या कार्यात त्यांनी दिलेल्या योगदानाची व विश्वासार्हतेची ही पावती मानली जात आहे.

संचालकपदी निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष, संचालक मंडळ, सभासद, सचिव, कार्यकारी संचालक तसेच कर्मचारी वर्ग यांच्या वतीने विकास कांबळे यांचे अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या अनुभवाचा व कार्यक्षमतेचा संस्थेच्या प्रगतीस निश्चित लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या निवडीबद्दल सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. जेमोन वर्गीस, डॉ. विजय संसारे, डॉ. प्रदीप जारे, आसावरी झपके, वैशाली पठारे, सॅम्युअल वाघमारे, शरद गुंडरस, गिरीश शिरसाठ, किरण गीते, नाजीम बागवान, अमित सिंग, किशोर ढगे, भीमसेन जगताप, प्रदीप रत्नपारखे, संतोष अग्रवाल, विकास भालेराव, मीनाबाई सिसवाल यांच्यासह सीएसआरडी अंतर्गत कार्यरत प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

विकास कांबळे हे सध्या सीएसआरडीमध्ये कार्यरत असून शैक्षणिक संस्था, सहकारी चळवळ आणि कर्मचारी कल्याणाच्या कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यांच्या या बिनविरोध निवडीमुळे संस्थेची सहकार, पारदर्शकता आणि विकासाभिमुख वाटचाल अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## न्यू आर्ट्स महाविद्यालयात 'कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान आणि ऊस शेती'वर कार्यशाळा

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

आजच्या आधुनिक युगात शेती अधिक शाश्वत, उत्पादनक्षम व फायदेशीर करण्यासाठी तंत्रज्ञानाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. याच उद्देशाने शेवगाव येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय येथे कम्युनिटी कॉलेज विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ''कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञान आणि ऊस शेती'' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा सोमवार, ता. २९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयातील राजर्षी शाहू महाराज सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेसाठी नोंदणी सकाळी १०.०० वाजता सुरू होणार आहे. या कार्यशाळेत कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथील कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ, संशोधक व अभ्यासक चंद्रकांत दिनकर दाते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य भारतीय कृषक समाजाचे अध्यक्ष बापूसाहेब भोसले हे असणार आहेत. कार्यशाळेत आधुनिक एआय तंत्रज्ञानाचा वापर करून ऊस शेतीत उत्पादन वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे, रोग व्यवस्थापन, हवामान आधारित निर्णय प्रक्रिया, डिजिटल शेती अशा विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शेतकरी, विद्यार्थी, संशोधक तसेच कृषी क्षेत्राशी संबंधित व्यक्तींना या कार्यशाळेचा मोठा लाभ होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन कम्युनिटी कॉलेजचे समन्वयक प्रा. योगेश रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. शेवगाव परिसरातील जास्तीत जास्त शेतकरी, विद्यार्थी व कृषीप्रेमींनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी केले आहे.



## हिवरगाव पावसा शाळेत राष्ट्रसंत गाडगेबाबा यांना अभिवादन

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

संगमनेर तालुक्यातील राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या हिवरगाव पावसा गावाचे त्यांच्याशी अतूट नाते आहे. सन १९५२ मध्ये राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या उपस्थितीत हिवरगाव पावसा येथे ऐतिहासिक साप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. त्या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ गेल्या ७४ वर्षांपासून हिवरगाव पावसा येथील खंडोबा देवगड देवस्थान येथे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम साप्ताहाचे आयोजन करण्यात येत आहे. स्वच्छता, शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश कीर्तनाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविणाऱ्या राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या स्मृतिदिनानिमित्त हिवरगाव पावसा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना मुख्याध्यापक आर. पी. रहाणे यांनी सांगितले की, सन १९५२ मध्ये राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी हिवरगाव पावसा येथे साप्ताहानिमित्त स्वच्छतेचा संदेश दिला आणि कीर्तन सेवा रुजवली. आजही त्यांच्या नावाने गावात सप्ताह परंपरेने सुरू आहे. भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, गोरगरिबांना शिक्षण व वस्त्र, बेघरांना निवारा, आजारी व्यक्तींना औषधोपचार, पशुपक्षी व मुक्या प्राण्यांना अभय, दुःखी व निराशांना धैर्य तसेच गरीब तरुण-तरुणींच्या विवाहास मदत करण्याबाबत गाडगेबाबा यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत, असे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी शिक्षक खतोडे, हरिभाऊ सहाने व श्रीमती बिडवे यांनीही राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास उपसरपंच सुजाता दवंगे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद पावसे, उपाध्यक्ष सोमनाथ भालेराव, सदस्य किरण पावसे, दीपक गुळवे, मंगल पावसे, सविता भालेराव, सुवर्णा हासे, सुशीला पावसे, पालक सदस्य महेंद्र भालेराव, शिवराज पावसे, आरोग्य सेविका स्वाती पावसे, सौ. दिवटे, मुख्याध्यापक आर. पी. रहाणे, अक्षय खतोडे, हरिभाऊ सहाने, मीनल बिडवे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.




## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा वाढदिवस 'प्रेरणा दिन' म्हणून साजरा

**पाथर्डी । नितीन गटाणी**

कुठलाही राजकीय वारसा नसताना शून्यातून विश्व उभारत गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत विविध पदांच्या माध्यमातून समाजबांधवांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केले आहे. त्यामुळेच त्यांचा वाढदिवस आम्ही 'प्रेरणादिन' म्हणून साजरा करतो, असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र दामोदरे यांनी केले. अखिल भारतीय रिपब्लिकन पार्टीचे अध्यक्ष तथा सामाजिक न्याय विभागाचे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या वाढदिवसानिमित्त पाथर्डी येथे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रुग्णांना फळांचे वाटप, शालेय विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप तसेच शहरातील आंबेडकर चौक येथे सर्व समाजबांधवांना पेढ्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी उत्तर महाराष्ट्र संघटक सुरेश भागवत, जिल्हा सरचिटणीस रवींद्र आरोळे, आतिश घोडके, सुरेश डोमकावळे, सुभाष लोखंडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना रवींद्र आरोळे म्हणाले की, रामदास आठवले यांनी युवकांचे संघटन करून दलित पँथरच्या माध्यमातून समाजकारणाला सुरुवात केली. समाजाविषयी असलेल्या तळमळीमुळे समाजबांधवांच्या आग्रहाखातर त्यांनी राजकारणात प्रवेश केला. कोणताही राजकीय वारसा नसताना गल्लीपासून दिल्लीपर्यंत विविध पदे भूषवत त्यांनी सामान्य जनतेला न्याय देण्याचा अहोरात्र प्रयत्न केला आहे. आगामी काळातही ना. आठवले यांच्या विचारांवर काम करून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहू, असेही त्यांनी सांगितले.



## अटल बिहारी वाजपेयी जयंती उत्साहात साजरी

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने भारतरत्न, माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आमदार मोनिका राजळे यांच्या कार्यालयात भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वाजपेयींच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

यावेळी वाजपेयी यांच्या विचारांचे व आदर्शांचे स्मरण करून भाजप कार्यकर्त्यांनी त्यांच्या आदर्शांचे अनुसरण करण्याचा संकल्प केला. त्यांची जयंती देशभरात ''सुशासन दिवस'' म्हणून साजरी केली जाते. देशाच्या विकासासाठी तसेच गरीब व वंचितांच्या उत्थानासाठी अटलजींनी केलेल्या ऐतिहासिक कार्याची आठवण करून देत भाजपाच्या वतीने त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमास भाजपाचे तालुकाध्यक्ष महेश फलके, युवामोर्चा अध्यक्ष अनिल सुपेकर, रविंद्र सुरवसे, शहराध्यक्ष राहुल बंब, संजय फडके, बापू धनवडे, गणेश कोरडे, गणेश रांधवणे, किरण पवार, गुरुनाथ माळवदे, डॉ. निरज लांडे, सुभाष बडधे, अमोल पालवे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना तालुकाध्यक्ष महेश फलके म्हणाले की, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचे जन्मशताब्दी वर्ष २५ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न होत आहे. या निमित्ताने भाजपाच्या वतीने देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अटल बिहारी वाजपेयी हे भारताच्या इतिहासातील एक तेजस्वी तारा असून त्यांनी केवळ राजकारणातच नव्हे तर साहित्य व पत्रकारितेच्या क्षेत्रातही आपल्या लेखणीची वेगळी छाप उमटवली. त्यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त आमदार मोनिका राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेवगाव तालुक्यात विविध कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी भाजप शेवगाव तालुक्याच्या वतीने या थोर व्यक्तिमत्त्वाला कृतज्ञतापूर्वक अभिवादन करण्यात आले.

# सर्वपक्षीय नेत्यांनी आम्हाला रोखण्याचा प्रयत्न केला

## हा पराभव नसून भविष्यातील विजयाची सुरुवात- मनोहर पोटे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे यांनी शिवसेनेचा स्वतंत्र पॅनल उभा करून विरोधकांशी दिलेला सामना निश्चितच कौतुकास्पद आहे. विकासाच्या मुद्द्यावर जनतेकडे मतांची मागणी करत त्यांनी सर्व उमेदवारांना ताकद दिली असून, या कार्याची पक्षाने दखल घेतली.

शिवसेनेचे नवनिर्वाचित ९ नगरसेवक लोकाभिमुख पद्धतीने काम करतील आणि विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख ॲड. उज्वला भोपळे यांनी दिली. नगर परिषद निवडणुकीनंतर आगामी रणनीती ठरविणे तसेच विजयी नगरसेवकांचा सत्कार करण्यासाठी श्रीराम मंदिर येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना तालुका प्रमुख नंदकुमार ताडे होते. ॲड. भोपळे पुढे म्हणाल्या की, शिवसेनेच्या वतीने महिला आरोग्य शिबिरे, घरकुल योजना, आरोग्य विषयक उपक्रम, रस्ते विकास आदींसाठी पदाधिकारी व नगरसेवकांनी समन्वयाने काम करावे. यावेळी मनोहर पोटे म्हणाले की, महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती करण्याची आमची भूमिका होती; मात्र ती काहींना मान्य नव्हती. त्यामुळे आम्ही स्वतंत्र पॅनल उभा केला. नागरिकांनी या भूमिकेचे स्वागत केले; मात्र स्थानिक नेतृत्व उभे राहू नये म्हणून शिवसेनेविरोधात सर्व पक्षीय नेते एकत्र आले. त्यामुळे नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराचा पराभव झाला. तसेच नगरसेवक निवडणुकीतही काही ठिकाणी विरोधकांनी अन्य पॅनलला मदत केल्यामुळे ३ ते ४ जागांवर शिवसेनेचे उमेदवार अल्प मतांनी पराभूत झाले. त्यामुळे हा पराभव भाजपने नव्हे, तर सर्व पक्षीय नेत्यांनी मिळून घडवून आणला, असे त्यांनी स्पष्ट केले. भविष्यात शिवसेनेचे ९ नगरसेवक उत्कृष्ट काम करून जनतेचा विश्वास अधिक दृढ करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसेना चांगली कामगिरी करेल. लवकरच पक्षाची पुढील भूमिका जाहीर केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी टिळक भोस, कांतिलाल कोकाटे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.



